REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविवास', पुणें ४.

# अर्थ


वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।

—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ४ पुणें, बुधवार, तारीख २३ नोव्हेंबर, १९३८ अंक ४६

# किर्लोस्कर

२५ फुटांहून खोल विहिरीसाठी किर्लोस्कर हुगळी पंपाची कामगिरी लोकांना फारच पसंत पडली आहे.

कारखान्याचे प्रतिनिधी आपल्यास भेटतील, त्यांना आपली गरज कळवा. म्हणजे आपल्या उपयोगी पडेल अशा किर्लोस्कर पंपाची निवड ते करून देतील किंवा थेट कारखान्यास लिहा. म्हणजे सविस्तर माहिती दिली जाईल.

## हुगळी पंप

किर्लोस्कर हात व पावर पंपांचा सचित्र कॅटलॉग मागवा

किर्लोस्कर बंधु लि. : : किर्लोस्करवाडी, सातारा

स्वतःचे मुलांना योग्य तऱ्हेनें शिक्षण देऊन त्यांचे आयुष्यांतील पुढील मार्गाची योग्य रीतीनें कालक्रमणा करण्याची तरतूद करून ठेवणें हें प्रत्येक विचारवंत मातापितरांचें आद्य कर्तव्य होय. वरील प्रकारची सोय, उत्तम रीतीनें, फक्त "आयुर्विम्या"चे योगेंच साधतां येते.

## कॉमनवेल्थ विमा कंपनी
### लिमिटेड, पुणें.

ह्या सर्वश्रेष्ठ विमा संस्थेनें मुलांच्या शिक्षणाचे सोयीकरतां नवीन तऱ्हेचीं विद्यार्जनाचीं कोष्टकें सुरू केलीं आहेत.

ह्या बाबतींतील विशेष माहितीकरतां खालील पत्त्यावर लिहा.

स. न. अभ्यंकर
बी. ए., एलएल. बी.,
मॅनेजिंग एजंट.

## S. B. JOSHI & Co.

ENGINEERS & CONTRACTORS

41 A, Bruce Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City.




अखिल हिंदुस्थानांत पहिल्या प्रतीचें अत्यंत लोकप्रिय

## झारापकर टेलरिंग कॉलेज

आप्पा बळवंत चौक, पुणें २

[ माहितीपत्रक मागवा ]

# विविध माहिती

**कॉडलिव्हर तेलाचा प्रचार**

नॉर्वे देशांतील कॉडलिव्हर ऑइलचा प्रचार करण्याकरितां त्या देशाचे व्यापारी प्रतिनिधि, मि. फ्रेड मेयर, हे हिंदुस्थानांत आले आहेत. समुद्रांत सापडणाऱ्या कॉड माशाचें तेल, म्हणजेच कॉडलिव्हर ऑइल होय. ह्या तेलांत "अ" आणि "ब" हीं जीवद्रव्यें (व्हिटॅमिन्स) असतात आणि शरीराच्या वाढीस त्यांचा बहुमोल उपयोग होतो. कॉडलिव्हर ऑइलच्या धंद्यावर नॉर्वे सरकारनें कडक देखरेख ठेवली आहे.

**चंदनाच्या तेलास मागणी**

ग्रेट ब्रिटनमध्यें चंदनाच्या तेलाचा खप वाढत आहे. साबणामध्यें ह्या तेलाचा उपयोग ज्यास्त ज्यास्त प्रमाणांत करण्यांत येऊं लागला आहे आणि त्यामुळें हिंदी चंदनाच्या तेलास चांगली मागणी आहे.

**इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स आणि वायरमेन**

इलेक्ट्रिकल सुपरवायझर्स आणि वायरमेन ह्यांच्या परीक्षेस ता. १६ जानेवारी रोजीं प्रारंभ होईल. मुंबई, पुणें आणि अहमदाबाद ह्या तीन केंद्रांत ही परीक्षा घेतली जाईल.

**मुंबई ते काठेवाड विमानांतून टपालाची वहातुक**

मुंबई ते काठेवाड विमानांतून टपालची वहातुक ता. २१ नोव्हेंबरपासून चालू होणार आहे.

**जळगांव येथें कॉटन मार्केट**

जळगांव येथील कॉटन मार्केटचें उद्घाटन ता. १२ नोव्हेंबर रोजीं पू. खानदेशच्या कलेक्टरांचे हस्तें झालें.

**लंडनमधील इस्पितळांतील रोगी**

लंडनमधील इस्पितळांतील रुग्णांची रोजची सरासरी ४३ हजार इतकी आहे.

**पॅलेस्टाइनमध्यें शांतता राखण्याकरितां तजवीज**

पॅलेस्टाइनमध्यें शांतता राखण्यासाठी ग्रेट ब्रिटननें ७,३०० पोलीस, ७०० वैमानिक दलांतील लोक आणि १५,५०० लष्करी शिपाई ह्यांची योजना केली आहे.

**मुंबई शहरांतील वैद्यकीय मदत**

डॉक्टर जिऑफ्रे इव्हॅन्स, ब्रिटिश वैद्यकीय तज्ज्ञ, हे बडोद्याच्या महाराजांस उपचार करण्यासाठी खास विमानांतून आले होते, ते डच कंपनीच्या विमानांतून गेल्या आठवड्यांत परत गेले. मुंबई शहरांतील वैद्यकीय उपचारांच्या व्यवस्थेचा दर्जा उत्कृष्ट आहे, असा अभिप्राय त्यांनीं एका मुलाखतींत व्यक्त केला. तथापि, इस्पितळांतून अधिक रुग्णांची सोय झाली पाहिजे, असें ते म्हणाले.

**देहान्त शासनाविरुद्ध कॉमन्स सभेंत ठराव**

देहान्त शासनाची शिक्षा प्रयोगादाखल पांच वर्षेपर्यंत कोणासहि देण्यांत येऊं नये असा ठराव, सरकारचा त्यास पाठिंबा नसतांहि, ब्रिटिश कॉमन्स सभेंत मंजूर झाला. ह्या ठरावानुसार वागण्याचें सरकारावर बंधन नाहीं हें उघड आहे.

**विजेचा प्रसार**

मुंबई प्रांतांतील ५४ ठिकाणीं विजेचा पुरवठा चालू असून ९ ठिकाणीं विजेच्या योजना पुऱ्या होत आल्या आहेत.

**ग्रेटब्रिटनच्या परराष्ट्रीय व्यापारांत घट**

| जानेवारी ते ऑक्टोबर | आयात (पौंड) | निर्गत (पौंड) |
|---|---|---|
| १९३७ | ८३ कोटि, ७० लक्ष | ४३ कोटि, ९० लक्ष |
| १९३८ | ७६ कोटि, ९० लक्ष | ३८ कोटि, ९० लक्ष |

**केमाल पाशांचा दफनविधि**

केमाल पाशांचा दफनविधि ता. २१ नोव्हेंबर रोजीं झाला. ह्या विधीप्रीत्यर्थ तुर्कस्तानाच्या असेंब्लीनें १३ लक्ष रुपये मंजूर केले होते.

**औद्योगिक वांध्यांमुळें नुकसान**

१९२८ ते १९३७ ह्या मुदतीमध्यें गिरणी मालक आणि कामगार ह्यांचेमध्यें सबंध हिंदुस्थानांत मिळून जे वांधे उपस्थित झाले त्यांत २८½ लक्ष कामगारांचे सुमारें ७ कोटि कामाचे दिवस बुडाले. ह्यांपैकी शेकडा ६० इतक्या नुकसानीचा वाटा मुंबई प्रांताकडे आला; ह्या प्रांतांतील कामगारांचे ४ कोटि कामाचे दिवस बुडाले.

**ट्रेझरी बिलांवर १ रु. ६ आ. ८ पै व्याजाचा दर**

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं २½ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं, त्यांवर व्याजाचा सरासरी दर द.सा. द. शे. १ रु. ६ आ. ८ पै इतका पडला.

**इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स बिल**

मुंबई सरकारच्या इंडस्ट्रिअल डिस्प्यूट्स बिलाची तीनहि वाचनें दोन्ही विधिमंडळांत मंजूर झालीं आहेत.

**हिंदी खाणींचें १९३७ मधील उत्पादन**

दगडी कोळसा : २२ कोटि टन (किंमत ७ कोटि रु.)
मँगेनीज : ८ लक्ष टन (किंमत १२ कोटि रु.)
लोखंड : १६ लक्ष टन (किंमत २७ लक्ष रु.)

**खाणींतलि कामगार**

सर्व प्रकारच्या हिंदी खाणींत मिळून १९३७ सालीं २ लक्ष, ६८ हजार मजूर कामावर होते, त्यांपैकी १ लक्ष, ७१ हजार कोळशाच्या खाणींत होते. १ ऑक्टोबर, १९३७ पासून स्त्री कामगारांस जमिनीखालीं काम करण्यास बंदी करण्यांत आली. खाणींतील अपघातांत १,१५६ लोकांस जबर दुखापती झाल्या आणि त्यांपैकी २४८ लोक मरण पावले.

**मुंबई–अहमदाबाद रस्ता**

मुंबई सरकारच्या मुंबई–अहमदाबाद रस्ता योजनेस हिंदुस्थान सरकारनें मंजुरी दिली आहे. ह्या रस्त्यामुळें रेल्वेचें उत्पन्न बुडूं नये, ह्यासाठी त्यावरील वहातुकीवर कांहीं नियंत्रणें घालण्यांत येतील.

**बँकांच्या नोकरवर्गास विवाहाची मनाई**

ग्रेटब्रिटनमधील बँकांतील, मासिक दोनशे रुपयांपेक्षा कमी पगार मिळवणाऱ्या कारकुनांस विवाह करण्याची मनाई आहे आणि बँकांतील नोकरवर्गाची संघटना मान्य करण्यास बँकांची तयारी नाहीं. ह्यासंबंधांत बँकांच्या नोकरवर्गांत असमाधान आहे तें व्यक्त करण्यासाठी पार्लमेंटचे सभासद, मि. हर्बर्ट मॉरिसन, ह्यांचे अध्यक्षतेखालीं नुकतीच त्यांची एक सभा भरली होती.

**हिंदुस्थानांत गव्हाची आयात**

| वर्ष | टन |
|---|---|
| १९३५–३६ | १३,०६६ |
| १९३६–३७ | ११७ |
| १९३७–३८ | २१,६८८ |
| १९३८–३९ (ऑक्टोबर अखेर) | ४२,३०२ |

**मुंबई बंदरांतून सोन्याची साप्ताहिक निर्गत**

| | किंमत रुपये |
|---|---|
| ५–११–३८ ते ११–११–३८ | २२, २३, ४९७ |
| १२-११-३८ ते १८–११–३८ | ३१, ०३, ०३७ |
| २१–९–३१ ते १८–११–३८ | ३,२१,९६,२५,५९१ |

## अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती ... | ५७० | गिरण्या—हिंदीकरणाची पुच्छप्रगति | |
| २ प्राप्तीवरील कराविषयींच्या बिलांत फेरफार ... | ५७१ | ६ महाराष्ट्रीय कारखानदार आणि व्यापारी ... | ५७५ |
| ३ दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणी ... | ५७२ | ७ एका नमुनेदार खेडेगांवाचें दृश्य ... ... | ५७६ |
| ४ मध्य युरोपांतील घडामोडींचा परिणाम ... | ५७२ | ८ गणेश मोफत वाचनालय | ५७७ |
| ५ स्फुट विचार | ५७३ | ९ पॅलेस्टाइन ... | ५७७ |
| मुंबई सरकारचें स्तुत्य औद्योगिक धोरण—आणीबाणीच्या प्रसंगास तोंड देण्याची फ्रान्सची तयारी—हिंदी कामगारांच्या रहाणीचें मान हलकें का ?—हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या | | १० निवडक बाजारभाव | ५७८ |
| | | ११ अंड्यांचा किफायतशीर धंदा ... ... | ५७८ |
| | | १२ सर जेम्स टेलर ह्यांची दिलगिरी ... ... | ५७८ |
| | | १३ पेट्रोलचें जागतिक उत्पादन ... ... | ५७९ |



# अर्थ

बुधवार, ता. २३ नोव्हेंबर, १९३८


## प्राप्तीवरील कराविषयींच्या बिलांत फेरफार

इनकम टॅक्स बिलावरील आपला रिपोर्ट सिलेक्ट कमिटीनें मध्यवर्ती असेंब्लीस सादर केला असून त्या बिलाचें दुसरें वाचन असेंब्लीमध्यें चालू झालें आहे. सिलेक्ट कमिटीचा रिपोर्ट असेंब्लीपुढें ठेवतांना हिंदुस्थान सरकारचे फडनवीस, सर जेम्स ग्रिग, ह्यांनीं भाषण करून बिलांतील योजनांची तरफदारी केली आणि सिलेक्ट कमिटीनें मूळ बिलांत केलेल्या दुरुस्त्यांचा उल्लेख केला. सिलेक्ट कमिटीनें बिलामध्यें मूलग्राही स्वरुपाचे फरक केलेले नाहींत आणि कर चुकविणारांविरुद्ध अंमलांत आणावयाची उपाय-योजना तिनें ज्यास्त कडक केली असली तरी सचोटीनें कर भरणारास निष्कारण त्रास पोंचणार नाहीं अशी तिनें व्यवस्था केली, आहे, असें ते म्हणाले. कराच्या आकारणीची ' स्लॅब ' पद्धतीहि त्यांनीं समजाऊन सांगितली. मनुष्याच्या सबंद प्राप्तीवर एकाच विवक्षित दरानें सध्या कर आकारला जातो. ह्या पद्धतीमुळें, कमी उत्पन्नाच्या मनुष्यावर कराचें फाजील ओझें पडतें. नवीन योजलेल्या टप्प्यांच्या अगर ' स्लॅब ' पद्धतीमध्यें उत्पन्नाच्या प्रत्येक चढत्या टप्प्यास कराचा चढता दर लागू होतो आणि त्यामुळें उत्पन्न आणि त्यावरील कराचा बोजा ह्यांमध्यें इष्ट अशी प्रमाणबद्धता रहाते. ज्या इनकम टॅक्स कमिटीच्या शिफारसींस अनुसरून प्रस्तुत बिलाची मांडणी करण्यांत आली आहे, तिनेंच नमुना म्हणून दिलेल्या कराच्या आकारणीचे तक्त्याप्रमाणें ८ हजारांपेक्षा कमी उत्पन्न असणारांवर ' स्लॅब ' पद्धतींत सध्यापेक्षा कमी कराची आकारणी होईल. ८ ते २४ हजार उत्पन्न असणारांपैकी कांहींचा फायदा होईल आणि २४ हजारांवरील सर्व उत्पन्नदारांस सध्यापेक्षा अधिक कर द्यावा लागेल. २,६०,००० लोकांवर, म्हणजे करास पात्र असणारांपैकीं ¾ लोकांवर, बिलांत अंतर्भूत झालेल्या ' स्लॅब ' पद्धतीमुळें हल्लींपेक्षा कमी कराची आकारणी होईल. कर आकारणीच्या पद्धतीमधील ही सुधारणा अत्यंत महत्त्वाची असून तिला विरोध होण्याचें कारण नाहीं.

इनकम टॅक्स बिलांतील ४९ व्या कलमाखालील करमाफीच्या परस्पर सवलतीमुळें ब्रिटिशांस फार मोठा फायदा होतो आणि त्या मानानें हिन्दी व्यक्तींस आणि कंपन्यांस फायदा होऊं शकत नाहीं; ह्या परस्पर सवलतीच्या योजनेमुळें हिंदुस्थानचें दरसाल १¾ कोटि रुपयांचें नुकसान होतें; बिलांतील प्रस्तुत कलम गाळल्यास वरील रकम नीमायर योजनेनुसार प्रांतिक सरकारांच्या वाटणीस येऊन तिचा विनियोग राष्ट्रसंवर्धक बाबींकडे होऊं शकेल; इत्यादि प्रकारच्या प्रस्तुत योजनेवरील काँग्रेस पुढाऱ्यांच्या जाहीर टीकेकडे दुर्लक्ष करणें सर जेम्स ग्रिग ह्यांस शक्यच नव्हतें. उपरिनिर्दिष्ट १¾ कोटि रुपयांचा आकडा एकेकाळीं बरोबर असला, तरी ताज्या माहितीप्रमाणें तो ८५ लाखांपेक्षा अधिक असण्याचा संभव नाहीं; ह्या ८५ लक्ष रुपयांपैकी २५ लक्ष रुपये सुपर टॅक्सचे वजा केले, तर कराचे उत्पन्नांतून प्रांतांस मिळण्याजोगे परंतु बिलांतील योजनेप्रमाणें विदेशीयांस माफ होणारे फक्त ६० लक्ष रुपयेच शिल्लक राहतात, असें सर जेम्स ह्यांनीं सांगितलें. विरोधी पक्षाचे पुढारी, श्री. भुलाभाई देसाई, ह्यांनीं आपल्या भाषणांत ह्या मुद्यास उत्कृष्ट उत्तर दिलें. इंग्रजांवरील कराचा बोजा हलका करण्याची कामगिरी हिंदी लोकांनीं कां स्वीकारावी ? असा त्यांनीं सवाल केला. इंग्रजांस त्यांचे हिंदुस्थानांतील उत्पन्नावर ग्रेट ब्रिटनमध्यें कर द्यावा लागतो, म्हणून हिंदुस्थाननें त्यांचेकडे सहानुभूतीनें पहावें, असा सर जेम्स ग्रिग ह्यांच्या भाषणाचा रोख दिसतो; परंतु ही रकम इंग्लंडला सहज सोडून देतां येण्यासारखी आहे, असें श्री. भुलाभाईंनीं सांगितलें. ग्रेटब्रिटनच्या बजेटांत ६० लक्ष रुपये ही किरकोळ बाब आहे, परंतु दारिद्री हिंदुस्थानास ती रकम मोठी वाटते, ह्यांत नवल नाहीं. प्रांतिक सरकारांस त्या रकमेंत वाटणी मिळावयाची असल्यानें त्यांचा बिलांतील वरील योजनेस विरोध असणार हें उघड आहे. असेंब्लीमध्यें चर्चेसाठी हा प्रश्न येईल, त्यावेळीं सरकार आणि विरोधी पक्ष ह्यांच्या बलाची कसोटी लागेल.

इनकम टॅक्सचे बाबत तक्रारींचा निवाडा करण्यासाठी एका स्वतंत्र कोर्टाची स्थापना करण्याची महत्त्वाची योजना सिलेक्ट कमिटीनें बिलांत अंतर्भूत केली आहे. ह्या कोर्टाचा एक सभासद कायदेपंडित असेल आणि एक हिशेबांमध्यें तज्ज्ञ असेल अशीच त्याची रचना करण्यांत यावयाची आहे. कर भरणारांच्या तक्रारी आतां निःपक्षपातीपणें त्रयस्थांकडून ऐकल्या जाऊन त्यांचें समाधान होऊं शकेल. डिव्हिडंडच्या व्याख्येमध्यें सिलेक्ट कमिटीनें दुरुस्ती केली असून भागीदारांस रोख मिळावयाच्या रकमांवरच कराची आकारणी होईल अशी तिनें व्यवस्था केली आहे. कंपनीच्या भांडवलामध्यें वाढ करणारे बोनसचे भाग डिव्हिडंड ह्या सदराखाली येणार नाहींत आणि त्यामुळें हिंदी कंपन्यांच्या भांडवलाची जोपासना होण्यास सहाय होईल अशी अपेक्षा आहे. झिजेदाखल उत्पन्नांतून वजा करावयाच्या रकमेबाबतहि सिलेक्ट कमिटीनें इष्ट अशी दुरुस्ती केली आहे. करास पात्र असणारानें आपण होऊन आपल्या उत्पन्नाचा तक्ता दाखल केला पाहिजे अशी बिलांत सक्ती करण्यांत आली असली तरी तिचा जाचकपणा सिलेक्ट कमिटीनें कमी केला असून २½ हजारांखालील उत्पन्नदारांस त्याबाबत शासनाचे कचाट्यांतून वांचविलें आहे. एकंदरीनें पहातां सिलेक्ट कमिटींतून बाहेर पडलेलें बिल पुष्कळच सुधारलेलें आहे आणि त्याचें श्रेय श्री. भुलाभाई देसाई ह्यांस दिलें पाहिजे. सिलेक्ट कमिटीमध्यें सरकारचें मताधिक्य असल्यामुळें कित्येक आवश्यक दुरुस्त्या करणें विरोधीपक्षास कठीण गेलें असलें तरी असेंब्लीमध्यें कांहीं महत्त्वाच्या बाबतींत तरी सर्व बिनसरकारी सभासद एकजुटीनें वागून हिन्दी तिजोरीच्या आणि त्याचबरोबर हिन्दी लोकांच्या हिताचें संरक्षण करतील अशी आशा आहे. हिंदी हितसंबंधांचें रक्षण करतांना ब्रिटिशांचें नुकसान होत असेल, तर तें टाळण्यासाठी यत्न करणें म्हणजे परोपकार करणेंच होय. असा परोपकार करण्याजोगी हिंदुस्थानची आज परिस्थिति नाहीं.

---

## दक्षिण आफ्रिकेंतील सोन्याच्या खाणी

१४९२ सालापासून आतांपर्यंत एकूण १ अब्ज, २३ कोटि फाइन औंस सोन्याचें सबंध जगांत मिळून उत्पादन झालें.त्यापैकीं एक चतुर्थांश सोनें दक्षिण आफ्रिकेंतील खाणींतून १८८६ सालापासून आजवर निघालें, ह्यावरून दक्षिण आफ्रिकेचें जगाच्या आर्थिक व्यवहारांत केवढें प्रचंड महत्त्व आहे हें दिसून येतें. १८८६ सालीं दक्षिण आफ्रिकेंतील ट्रान्सवालमधील विट वॉटर्स रॅन्ड ( व्हाइट वॉटर्स रिज ) येथील सोन्याच्या खाणींचा शोध लागला. तेव्हांपासून ह्या खाणींच्या उत्पादनाचें महत्त्व एकसारखें वाढत आहे. तीस वर्षांपूर्वी रॅन्ड खाणींचें वार्षिक उत्पादन जागतिक उत्पादनाच्या एक तृतीयांशाइतकें होतें.आतां तें एक द्वितीयांशाइतकें आहे.ह्या खाणींचे धंद्यांत आज ४१हजार युरोपियन आणि ३ लक्ष, ३५ हजार युरोपियनेतर लोक कामावर आहेत. १९३७ सालीं ह्या खाणींतून १ कोटि, १७लक्ष फाइन औंस सोनें निघालें आणि त्याची किंमत सुमारें ११० कोटि रुपये भरली. कर आणि नफ्यांतील भागीदारी ह्यांचे रूपानें खाणींच्या धंद्यापासून तेथील सरकारास दरसाल सुमारें १९ कोटि रुपये मिळतात, म्हणजे सरकारच्या एकूण उत्पन्नापैकीं एक तृतीयांश उत्पन्नाचें मूळ सोन्याच्या चाळीस खाणी हेंच आहे. सोन्याच्या खाणींचे किफायतशीर व्यवहारावर दक्षिण आफ्रिकेंतील निम्याहून अधिक लोकांचें जीवित अवलंबून आहे.

खाणींतील मजुरीचें काम युरोपियनांचे देखरेखीखालीं स्थानिक लोक करतात. कित्येक मजूर लोक स्वखुषीनेंच स्वतः काम पत्करतात, परंतु मजूर मिळवून देणाऱ्या कंत्राटदारांस दर माणशीं कमिशन देण्याची पद्धतहि अंमलांत आहे. ह्या पद्धतीनें शेकडा २५ मजुरांची भरती होते. कामाच्या २७० पाळ्या झाल्याखेरीज मजुरांस काम सोडून जातां येत नाहीं, परंतु ते तसे सोडून गेल्यास तो फौजदारी गुन्हा समजला जातो. आफ्रिकन तद्देशीयांस इतर मागसलेल्या लोकांप्रमाणेंच आपली जबाबदारी कळत नाहीं आणि त्यांची स्वतःची कांहींच मालमत्ता नसल्यानें त्यांचेकडून नुकसानभरपाई घेण्यास साधन उरत नाहीं. तुरुंगवास पत्करण्यांत त्यांस कमीपणा वाटत नसल्यानें, त्याच्या भीतीनें ते पैसे भरण्याचा संभव नसतो. तेव्हां कराराच्या मुदतीचे आधींच काम सोडून जाणारांवर फौजदारी करणें हा उपाय दक्षिण आफ्रिकेंत अवलंबण्यांत येतो. कामावर रुजू होण्यापूर्वी मजुरांस ४० रुपये आगाऊ दिले जातात आणि ही रकम त्याचे मजुरींतून कापली जाते. मजुरांस कामावर घेण्यापूर्वी त्यांची कसून वैद्यकीय तपासणी घेतली जाते. स्थानिक लोकांस इतरत्र काम मिळण्यास वाव नसल्यामुळें सोन्याच्या खाणींतील काम त्यांस स्वीकारणें भागच पडतें. आपल्या कामगारांची कार्यक्षमता टिकविण्याचे दृष्टीनें खाणीवाल्या कंपन्या विवक्षित मर्यादेंत शक्य ते प्रयत्न करतात. सोन्याची किंमत आतां वाढली असल्याकारणानें, दक्षिण आफ्रिकेंतील खाणींचा धंदा चलतींत आहे. ( मँ. गा. क. वरून )

## मध्य युरोपांतील घडामोडींचा कपास कापडाच्या धंद्यावर परिणाम

जर्मनीनें सबंद ऑस्ट्रिया आणि झेकोस्लाव्हेकियाचा महत्त्वाचा भाग गिळल्यामुळें त्या राष्ट्राच्या मालकीच्या कापसाचें सूत कातणाऱ्या यांत्रिक चात्यांची संख्या पुष्कळ वाढली आहे. गेल्या जुलै अखेर जर्मन ( ऑस्ट्रिया धरून ) गिरण्यांत एकूण १ कोटि, १० लक्ष चात्या होत्या. ह्यांपैकीं ७½ लक्ष ऑस्ट्रियन ( आतां जर्मन ) प्रदेशांतल्या होत्या. ह्या आकड्यांत आतां झेकोस्लाव्हेकियापैकीं ३३ लक्ष चात्यांची भर पडली आहे. म्हणजे आतां १ कोटि, ४४ लक्ष चात्या जर्मनीच्या मालकीच्या झाल्या. सर्व जगांत मिळून १४ कोटि, ७१ लक्ष चात्या सूत कांतण्याच्या कारखान्यांत आहेत, त्यांतला सुमारें दहावा हिस्सा चात्या जर्मनींत आज आहेत. यांत्रिक चात्यांच्या संख्येच्या बाबतींत ग्रेट-ब्रिटनचें अग्रस्थान आहे. त्या देशांत ३ कोटि, ६८ लक्ष चात्या आहेत. त्याच्या खालोखाल अमेरिकेंत २ कोटि, ६३ लक्ष आहेत. त्याच्याखालीं तिसरा नंबर जर्मनीचा आहे. जपानचा चौथा नंबर लागतो आणि जपानी चात्यांची संख्या १ कोटि, २५ लक्ष आहे. रशियांत अजमासें १ कोटि आणि फ्रान्समध्यें ९७ लक्ष चात्या आहेत. जर्मनीच्या ताब्यांतून १९१८ सालीं आल्सेस प्रांत फ्रान्सच्या हातीं गेला, त्यामुळें चात्यांचें झालेलें नुकसान आतां भरून निघालें आहे. गेल्या जुलै अखेर पुऱ्या झालेल्या वर्षांत कापसाच्या १६ लक्ष ३५ हजार गाठी जर्मन गिरण्यांत खपल्या. म्हणजे जगांत खपलेल्या एकूण कापसाच्या एक-सोळांश हिस्सा जर्मन कारखान्यांनीं वापरला. हिंदुस्थानांतील गिरण्यांची संख्या ३८० असून त्यांत २ लक्ष, माग आणि १ कोटि, २० हजार चात्या आहेत. हिंदुस्थान देशाची प्रचंड लोकसंख्या आणि त्यांत मोठ्या प्रमाणावर होणारें कपाशीचें पीक लक्षांत घेतां येथील गिरण्यांतील चात्यांची संख्या योग्य प्रमाणापेक्षा कमी आहे ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. झेकोस्लाव्हेकियांतले एक लक्ष मागहि जर्मन मुलखांत आतां आल्यानें जर्मनीचें कपास कापडाचें उत्पादन प्रमाणाबाहेर वाढणार आहे. इतक्या मागांवर निघणारें कापड खपण्यास जर्मनींत वाव नाहीं आणि तें परदेशांत पाठवावें लागेल. परंतु जर्मन माल घेण्यास अमेरिकेसारखीं राष्ट्रें तयार नसल्यानें ह्या बाबतींत जर्मनीची कुचंबणा झाल्यावांचून राहणार नाहीं. जर्मनीस जोडलेल्या झेकोस्लाव्हेकियन प्रदेशांतील कापड आणि इतर माल ( कांच, चिनी मातीचीं भांडीं, खेळणीं, पायमोजे इत्यादि ) झेकोस्लाव्हेकियांत खपावा म्हणून विशेष योजना जर्मनीस करावी लागेल. जगांतील कापसाच्या कापडाच्या आणि इतर बाजारांवर गेल्या दोन-तीन महिन्यांतील मध्य युरोपियन घडामोडीचा महत्त्वाचा परिणाम होणार आहे. प्रत्येक पुढारी राष्ट्र ह्या फेरबदलाचा शक्य तेवढा फायदा स्वतःस करून घेतल्यावांचून रहाणार नाहीं, हें उघड आहे.

पुण्यांत येणाऱ्या प्रवाशांसाठीं भोजनाचें व उतरण्याचें निर्धास्त ठिकाण.

पूना
# गेस्ट हाऊस
टेलिफोन नं. ७७९ : लक्ष्मी रोड—गणपति चौक—पुणें

हवेशीर जागा
सुग्रास भोजन
उत्तम आदरातिथ्य

# स्फुट विचार

## मुंबई सरकारचें स्तुत्य औद्योगिक धोरण

होतकरू स्वदेशी धंद्यांत सरकारचें प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष सहाय असल्यावांचून त्यांची स्थापना होणें अवघड असल्याचा अनुभव आलेला आहे. भांडवल, शास्त्रीय व यांत्रिक ज्ञान आणि औद्योगिक संघटन ह्यांचे बाबतींत हा देश अजून मागसलेल्या स्थितींत असल्यानें आणि जागतिक आर्थिक स्पर्धा अधिकाधिक तीव्र होत चालल्यामुळें अशा प्रकारचें सरकारी उत्तेजन हिंदी उद्योगधंद्यांत अपरिहार्य झालें आहे. नैसर्गिक अनुकूलता आणि धंदे काढणारांमध्यें कार्यक्षमतेच्या गुणाचें अस्तित्व ह्या गोष्टींची जोड असूनहि औद्योगिक बाल्यावस्थेमुळें प्रगति होऊं शकत नसेल तेथें सरकारनें धंद्यांच्या उपक्रमास हातभार लावून संपत्तीच्या वाढत्या उत्पादनास चालना देणें उचित आणि आवश्यक आहे. मुंबई इलाख्यांतील सरकारी औद्योगिक खात्याकडून संशोधन, औद्योगिक सल्ला, माल विक्रीस मदत इत्यादि स्वरूपांत उद्योगधंद्यांस सहाय देण्यांत येत आहे. तथापि जागतिक, राष्ट्रीय आणि प्रांतिक परिस्थिति लक्षांत घेतां ह्यापेक्षां अधिक धडाडीचें आणि विस्तृत सहाय देण्याचें धोरण सरकारनें अंगिकारणें अगत्याचें झालें आहे. ही गोष्ट ध्यानांत आणून मुंबईच्या प्रधानमंडळानें प्रांतिक असेंब्लींत ठराव पुढें मांडून ह्या प्रकारच्या धोरणाचा आपण स्वीकार करीत असल्याची स्पष्ट घोषणा केली ह्याबद्दल सरकारचें आणि विशेषतः उद्योगमंत्रि, श्री. पाटील, ह्यांचें अभिनंदन केलें पाहिजे. योग्य चौकशीअंतीं अगत्याचें वाटेल तेथें परिस्थितीस अनुसरून स्वदेशी धंद्यांत ( १ ) भांडवल पुरवणें, ( २ ) भांडवलावर विशिष्ट दरानें व्याज सुटण्याची हमी घेणें, ( ३ ) शास्त्रीय व यांत्रिक सल्ला देणें आणि ( ४ ) इतर सवलतींची व्यवस्था करणें इत्यादि प्रकारांपैकी योग्य त्या उपायांनीं सहाय देण्याचें सरकारनें ठरवलें असून त्याच्या ह्या धोरणास विधिमंडळानें ठराव मंजूर करून मान्यता दिली आहे. मद्रास प्रांत आणि म्हैसूर संस्थान येथें ह्या रीतीच्या धोरणाचा स्वीकार सरकारांनीं केलेला आहे. वरील तऱ्हेचें सहाय लहान धंद्यांसच नव्हे तर मोठ्या प्रमाणावरील धंद्यांस आवश्यक असतें आणि तें देण्याची आपली तयारी सरकारनें स्पष्टपणानें दर्शवली ही गोष्ट स्तुत्य आहे. असेंब्लीमधील निरनिराळ्या पक्षांनीं ह्या कामीं सरकारास हार्दिक पाठिंबा दिला हें त्यांसहि भूषणावह असून त्यांच्या स्वदेशीविषयींच्या कळकळीचें द्योतक आहे.

## आणीबाणीच्या प्रसंगास तोंड देण्याची फ्रान्सची तयारी

आपला देश आलेल्या आणीबाणीच्या प्रसंगास तोंड देण्यास तयार नाहीं, हें लक्षांत येतांच फ्रेंच सरकारनें त्याबाबत निर्वाणीचे उपाय योजण्यास प्रारंभ केला आहे. गेलीं अनेक वर्षें फ्रान्सला स्थिर प्रधानमंडळ लाभलेलें नाहीं आणि त्या देशाचें सरकारी धोरण वरचेवर बदलत आलेलें आहे. सरकारावरील समाजसत्तावादी लोकांच्या प्रभावी वजनामुळें, उत्पन्नाच्या वांटणीकडे आणि कामगारांच्या सुखसोईकडे तेथील सरकारनें जेवढें लक्ष दिलें तेवढें उत्पादन वाढविण्याकडे त्यास देतां आलें नाहीं. ह्यामुळें युद्धप्रसंग अपरिहार्य आहे असें दिसत असतांनाहि आपल्या राष्ट्रीय सत्तेच्या वजनानें आंतरराष्ट्रीय घडामोडींस वळण लावणें फ्रान्सला अशक्य झालें; उलट, त्या देशास स्वतःच्या रक्षणाविषयींची काळजी वाटूं लागली. राष्ट्राचें आर्थिक बळ दृढ करणें, त्याच्या उत्पन्न-खर्चाची तोंडमिळवणी करणें, चलनामध्यें स्थैर्य उत्पन्न करणें, देशाचें उत्पादन वाढविणें, उद्योगधंद्यांवरील सरकारी नियंत्रण कार्यक्षम करणें, इत्यादि बाबी फ्रेंच प्रधान मंडळानें आतां हातीं घेऊन उद्भवलेल्या संकटास तोंड देण्याचें निश्चित केलें असून, त्या संबंधांत जरूर ते हुकूम सोडले आहेत. केवळ चलनाची किंमत उतरवून अगर कर्जें उभारून तात्कालिक उपाययोजना करण्याऐवजीं दीर्घकालीन सुधारणा घडवून आणणारी व्यापक योजना त्या प्रधानमंडळानें आंखली आहे. बँक ऑफ फ्रान्सजवळील सुवर्णसंचयाची किंमत १ पौंड स्टर्लिंग=११० फ्रँक, ह्या हिशेबानें करण्यांत येत असे; आतां १ पौंड स्टर्लिंगास १७० फ्रँक ह्या दरानें त्या सोन्याची किंमत करण्यांत येत आहे. बँक ऑफ फ्रान्सच्या सुवर्णसंचयाची किंमत त्यामुळें १७ कोटि पौंडांनीं वाढेल आणि त्या संस्थेच्या व्यवहारास मजबुती येईल. फ्रान्समध्यें सर्व प्रकारच्या उत्पन्नावर जबर कर बसविण्यांत येत आहे आणि पोस्टाचे व तारेचे दरहि वाढविले जात आहेत. अठ्ठेचाळीस तासांच्या आठवड्यानें पुरेसें उत्पादन होणें कठीण आहे हें जाणून प्रधानमंडळानें ५४ तासांच्या आठवड्यास संमति दिली आहे. कारखानदारांवरहि कर बसविण्यांत येत आहेत. फ्रान्सची लोकसंख्या वाढविण्यासाठी प्रचार करण्याकरितां एक स्वतंत्र फंड उभारण्याची मंत्रिमंडळाची योजना आहे. ह्या फंडामध्यें दरसाल २० कोटि फ्रँक्स टाकण्यांत येतील. बेकारांसाठीं व्यवसायात्मक शिक्षणाची तरतूदहि प्रधानमंडळ करणार आहे. वरील प्रकारच्या धडाडीच्या व्यापक धोरणाचा तीन वर्षांचा कार्यक्रम प्रधानमंडळानें आखला आहे. फ्रेंच जनतेनें ह्या धोरणास हार्दिक पाठिंबा दिलेला दिसतो आणि त्यावरून वरील कार्यक्रम यशस्वी होईल अशीं तूर्त तरी चिन्हें दिसत आहेत. फ्रेंच राजकारणाचा अनिश्चितपणा सुप्रसिद्ध आहे. तथापि सबंध राष्ट्रावर संकट आलें असतां मतभेद व पक्षभेद विसरून तांतडीचे कार्यक्रम जुटीनें पार पाडण्याचा फ्रान्सचा हा निश्चय बोधप्रद आहे.

---

## हिंदी कामगारांच्या रहाणीचें मान हलकें कां ?

आंतरराष्ट्रीय मजूर संघानें ( इंटरनॅशनल लेबर ऑफिसनें ) जगांतील निरनिराळ्या देशांमधील कामगारांच्या रहाणीची तुलना आपल्या रिपोर्टांत केली आहे तीवरून हिंदी जनतेचा जीवनक्रम किती हलक्या प्रतीचा आहे, ह्याची कल्पना येते. रहाणीच्या मानामध्यें खालील तीन गोष्टींचा अंतर्भाव होतो:— ( १ ) विवक्षित मुदतींत व्यक्तीच्या अगर कुटुंबाच्या वाटणीस येणाऱ्या उपभोग्य वस्तु; ( २ ) आरोग्य, शिक्षण, करमणूक, इत्यादिबाबत समाजानें अगर राष्ट्रानें केलेली तरतूद; ( ३ ) कामासंबंधीं सोयी आणि सवलती. वर निर्दिष्ट केलेल्या रिपोर्टांत ह्या तीन स्थूल विभागांत पडणाऱ्या बाबींच्या तुलनात्मक अभ्यासाच्या आधारानें रहाणीच्या मानासंबंधीं मत व्यक्त करण्यांत आलें आहे. हिंदुस्थानांतील उत्पादनविषयक आकडे आणि रहाणीच्या खर्चाचे तपशील विचारांत घेऊन कमिटीनें आपला अभिप्राय नमूद केला आहे. हिंदी मनुष्यास रहाणीचें मान सुधारण्याची कल्पनाच शिवलेली नाहीं आणि कांहीं किमान उत्पन्न मिळाल्यास अधिक मिळविण्याची त्याची प्रवृत्ति नसते, असें रिपोर्टांत म्हटलेलें आहे. ही वृत्ति-आर्थिक प्रगतीच्या मार्गांतील

एक अडचण असली, तरी तिलाच प्रधान महत्त्व देऊन, हिंदी लोकांच्या दुःस्थितीच्या इतर कारणांकडे दुर्लक्ष करून भागणार नाहीं, हें मात्र ध्यानांत बाळगलें पाहिजे. आर्थिक आणि ऐहिक उन्नतीची कल्पनाच हिंदी लोकांस अपरिचित आहे असें म्हणणें सोपं असलं तरी तें उथळ विचाराचें लक्षण आहे. हिंदी लोकांचा अल्पसंतुष्टपणा हें त्यांच्या खालावलेल्या स्थितीचें लक्षण आहे. प्रगतीची इच्छा आणि आर्थिक सुधारणा परस्परावलंबी असतात हें येथें विसरतां कामा नये.

---

### हिंदुस्थानांतील कपास कापडाच्या गिरण्या

सबंद हिंदुस्थानांत मिळून कपास कापडाच्या ३८० गिरण्या आहेत. १९३७-३८ अखेर (सप्टेंबर १९३७ ते ऑगस्ट १९३८) अहमदाबादमधील ९ गिरण्या बंद पडल्या; भडोच येथील गिरणीनें काम थांबवलें परंतु जामनगर आणि नवसरी येथें दोन नवीन गिरण्या चालू झाल्या. मुंबई शहरांतील गिरण्यांची संख्या कायम राहिली. फेब्रुवारी, १९३७ मध्यें चालू झालेली सिंधमधील गिरणी बंद आहे. एकूण ३८० गिरण्यांपैकी १९३७-३८ मध्यें २५ गिरण्या चालू नव्हत्या. गिरण्यांतील चात्या, माग, गुंतलेलें भांडवल, कामगारांची संख्या, इत्यादि बाबतची माहिती खालीं दिली आहे:—

| | १९३६-३७ | १९३७-३८ |
|---|---|---|
| चात्या | ९७,३१,००० | १,००,२०,००० |
| माग | १,९७,१८४ | २,००,२८४ |
| भांडवल ( रु. ) | ४० कोटि, ४९ लक्ष | ३९ कोटि, ८३ लक्ष |
| कपाशीचा उठाव (खंडी) [७८४ पौं. = १ खंडी] | १५ लक्ष, ८१ हजार | १८ लक्ष, ३१ हजार |
| गिरणी कामगार | ४ लक्ष, १७ हजार | ४ लक्ष, ३८ हजार |

मुंबई शहरांतील गिरण्यांत २९ लक्ष चात्या आणि ६½ हजार माग आहेत; अहमदाबादमधील चात्यांची संख्या १९ लक्ष, ४२ हजार आणि मागांची संख्या ४७ हजार भरते. मुंबई प्रांतांतील इतर ठिकाणीं मिळून १२ लक्ष चात्या आणि २६⅓ लक्ष माग आहेत.

---

### हिंदीकरणाची पुच्छ-प्रगति

इंपीरिअल बँक ऑफ इंडियाच्या अधिकारी वर्गांत विदेशीयांचा भरणा मोठा आहे अशी फार जुनी तक्रार आहे. बँकेच्या डायरेक्टरांत हिंदी डायरेक्टरांचें मताधिक्य असावें आणि बँकेच्या नोकरवर्गात ह्यापुढें विदेशी लोकांची भरती करण्यांत येऊं नये, अशी सूचना सात वर्षांपूर्वी मध्यवर्ती बँकिंग कमिटीनें केली होती. तथापि बँकेच्या अधिकारी वर्गांतील विदेशीयांचें प्रमाण कमी न होतां ते वाढलेलें आहे असें आढळतें! १९२५ सालीं ३४ हिंदी अधिकारी होते आणि आतां एकूण २०२ अधिकाऱ्यांपैकीं फक्त २५ च हिंदी आहेत, असें बिहार चेंबर ऑफ कॉमर्सनें दाखवून दिलें आहे. इंपीरिअल बँकेमध्यें अजूनहि विदेशीयांस प्राधान्य मिळावें, हें खरोखर चमत्कारिक आहे. बँकेनें ह्यासंबंधांत खुलासा करणें आवश्यक आहे.

---


## दि बँक ऑफ महाराष्ट्र, लिमिटेड.

लक्ष्मीरोड, पुणें शहर.

अधिकृत भांडवल......रु. १०,००,०००
विक्रीस काढलेलें भांडवल ...रु. ५,००,०००
खपलेलें भांडवल........रु. २,४४,६००
वसूल झालेलें भांडवल...रु. १,२२,३००

**शाखा**

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

**डायरेक्टर्स**

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पवार, श्री. टी. व्ही. रानडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सेव्हिंग्ज खात्यावर चेक काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एम. व्ही. गोखले, मनेजर.



## Notice to Share-holders

Notice is hereby given that an EXTRA-ORDINARY GENERAL MEETING of the Shareholders of the Commonwealth Assurance Company, Ltd., Poona, will be held at the Company's Registered Office, 11 Budhwar Peth, John Small Memorial Hall, Opposite Huzur Paga, Poona City, on Sunday, the 11th December 1938 at 5-30 p. m. to transact the following business:—

1. To receive and adopt the Third Triennial Valuation Report for the Triennium 1-5-35 to 3-4-38 as submitted by the Actuary and Board of Directors' report thereon.
2. To declare Dividend to share-holders and Bonus to participating Policy-holders.
3. To transact such other Business as may be brought before the Meeting by the Chairman regarding the said Valuation.

By order of the Board of Directors,

Poona. 16-11-38 } Abhyankar & Co. Managing Agents

# महाराष्ट्रीय कारखानदार आणि व्यापारी

## नामदार पाटील आणि मुंबई सरकारचें औद्योगिक धोरण

महाराष्ट्रांतील कारखानदार आणि व्यापारी ह्यांच्या अडचणी व गरजा ह्यांविषयीं त्यांचेकडून मिळवलेली माहिती मुंबई सरकारच्या उद्योग-मंत्र्यांचे पुढें मांडावी ह्या हेतूनें येथील **मराठा चेंबर ऑफ कॉमर्स आणि इंडस्ट्रीजचे** कर्तबगार चिटणीस, श्री. आ. रा. भट, ह्यांनीं नामदार पाटील यांचे सन्मानार्थ सदर्न निटिंग वर्क्सचे आवारांत उपहाराचा थाटाचा समारंभ गेल्या शनिवारीं घडवून आणला. प्रथमतः निमंत्रित मंडळींची नामदारांस ओळख करून देण्यांत आली. नंतर श्री. भट ह्यांनीं स्वागतपर भाषण केलें. उद्योगधंद्यांस द्यावयाच्या सहायासंबंधानें प्रांतिक सरकारनें विधिमंडळांत मान्य करून घेतलेल्या ठरावाचा उल्लेख करून, नामदार पाटील ह्यांनीं लहान-मोठ्या अनेक कारखान्यांची माहिती त्यांस स्वतः भेट देऊन सहानुभूतिपूर्वक मिळविली असल्याबद्दल त्यांचा गौरव केला. महाराष्ट्रीयांनीं चालवलेले असे मोठ्या प्रमाणावरील कारखाने फार थोडे असून त्यांतले बहुतेक सर्व मध्यम आकाराचे आहेत. त्यांस लोकांच्या विशिष्ट मनोभावनेमुळें आणि औद्योगिक भवितव्याच्या अनिश्चितपणामुळें भांडवल मिळण्याची फार अडचण पडते. ती सरकारच्या सहायानें दूर केली जावी असें त्यांनीं सुचवलें. म्युनिसिपालिट्यांकडून घेण्यांत येणाऱ्या जकातीचा बोजा आणि विजेचे दर कित्येक धंद्यांस असह्य होतात ह्या गोष्टीचा उल्लेख करून सरकारानें आपल्या खात्यांत वापरल्या जाणाऱ्या वस्तू स्वदेशी कारखानदारांकडून घ्याव्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांस तसें करण्यास लावावें अशीहि सूचना त्यांनीं केली. तसेंच, कारखान्यांस लागणारी जागा जरूर तेथें सरकारनें अक्वायर करण्याची आवश्यकता त्यांनीं प्रतिपादली. मुख्य प्रधान, नामदार खेर, ह्यांनीं महाराष्ट्रीय धंद्यांसंबंधानें विशेष सहानुभूतीचे उद्गार काढले होते, त्यांचा निर्देश करून नामदार पाटील ह्यांच्या हातून त्या धोरणानें भरीव कामगिरी होईल अशी आशा प्रकट करून श्री. भट ह्यांनीं आपलें भाषण संपवलें.

ह्यानंतर मराठा चेंबरचे अध्यक्ष, प्रो. काळे, ह्यांनीं भाषण केलें, त्याचा गोषवारा:— " योजनात्मक औद्योगीकरणाचें धोरण काँग्रेसनें स्वीकारलें आहे, त्यास मुंबईच्या प्रधान मंडळानें स्वदेशी धंद्यांस द्यावयाच्या सहायाविषयीं धडाडीचा कार्यक्रम आखला आहे तो परिपोषक होईल. महाराष्ट्रीय उद्योगधंद्यांच्या मार्गांत रेल्वेजच्या वहातुकीचे दर आणि जकातींच्या संरक्षणाचा अभाव ह्या मोठ्या अडचणी आहेत आणि त्यांच्या योगानें होतकरू कारखाने किफायतशीर रीतीनें चालवणें कठीण होतें. हे प्रश्न मुंबई सरकारच्या अधिकार-क्षेत्राच्या बाहेरचे असले तरी प्रांतिक सरकारांनीं जुटीनें मध्यवर्ती सरकारवर वजन पाडण्याचा यत्न केल्यास त्यास थोडेंबहुत यश आल्यावांचून रहाणार नाहीं. इतर बाबतींत अनुकूल परिस्थिति असूनाहि जरूर त्या भांडवलाचा पुरवठा कित्येक महत्त्वाच्या धंद्यांस होत नाहीं. हीं उणीव मात्र प्रांतिक सरकारांस भरून काढतां येण्यासारखी आहे. सरकारच्या सहायानें चाललेली औद्योगिक बँक किंवा तज्ञांची समिति ह्यांचे बाबतची योजना काळजीपूर्वक तयार करावी लागेल आणि तिला अनुसरून होतकरू धंद्यांस द्यावयाच्या भांडवलाच्या मदतीची रकम ठरवून द्यावी लागेल. सरकारचा पैसा हा कर देणाऱ्या जनतेचा पैसा असल्यानें त्याचा सदुपयोग आणि सुरक्षितता ह्याविषयीं खात्री करून घेणें उचितच होईल. सरकार, जनता, कामकरी आणि कारखानदार ह्यांचे हितसंबंध वस्तुतः परस्परावलंबी आहेत व त्यांचा योग्य मेळ घातला जाणें शक्य आहे. "

"हिंदुस्थानांत प्रांतिक स्वायत्तता स्थापन झाल्यापासून प्रत्येक प्रांत आपापल्या उद्योगधंद्यांच्या वाढीकडे विशेष लक्ष पुरवीत आहे. हिंदी प्रांत कित्येक पाश्चात्य देशांएवढे मोठे आहेत. त्यांनीं परस्परांशीं अनिष्ट स्पर्धा न करतां आपापले उद्योगधंदे अधिकांत अधिक कार्यक्षम होतील असा प्रयत्न अवश्य केला पाहिजे. कांहीं वर्षांमागें बंगाल प्रांतांत कापडाच्या गिरण्या नव्हत्या आणि अहमदाबादेचें कापड तिकडे जात असे. आतां तेथें वीस–पंचवीस गिरण्या चालू आहेत. मुंबई इलाख्यांतील नैसर्गिक अनुकूलतेचा पूर्ण फायदा घेण्यांत आला पाहिजे. विजेचें उत्पादन विस्तृत होऊन कोळशावरचें अवलंबन मर्यादित होणें जरूर आहे. कृत्रिम रेशीम आणि बांबूचा रांधा ह्यांच्या धंद्यांस सहाय देण्याचा सरकारचा विचार जाहीर झाला आहे तो ह्या दृष्टीनें अभिनंदनीय आहे. साखरेचे कारखाने आपल्या प्रांतांत निघाले आहेत, त्यांस नैसर्गिक परिस्थिती अनुकूल असल्यानें सरकारनें त्यांचेकडे सहानुभूतीच्या दृष्टीनें पहाणें अगत्याचें आहे. वस्तू विकत घेणारी जनता, कर देणारे नागरिक आणि कामकारी वर्ग ह्यांच्या हिताच्या संरक्षणावर सरकारचा कटाक्ष आहे तो यथायोग्य आहे असेंच कारखानदारांचें मत आहे यांत संशय नाहीं. उद्योगधंद्यांच्या प्रगतीचे बाबतींत मुंबईसरकारनें धडाडीचें धोरण अंगिकारलें आहे आणि नामदार पाटील हे त्या कामीं स्वतः विशेष लक्ष घालीत आहेत, ह्याबद्दल त्यांस धन्यवाद दिले पाहिजेत."

उत्तरादाखल भाषण करतांना **नामदार पाटील** म्हणालेः—

" औद्योगिक खातें माझ्या हातीं आल्यापासून मी लहान-मोठ्या उद्योगधंद्यांचें निरीक्षण केलें आहे. हें खातें करीत असलेल्या कामाची आणि देत असलेल्या सवलतींची जनतेस माहिती असावी तशी नाहीं. ह्या सवलतींचा पूर्ण फायदा लोकांनीं करून घेतला पाहिजे. व्यावहारिक शिक्षणाची तजवीज कारखानदारांच्या सहकार्यानें करण्यांत आली आहे आणि शास्त्रीय प्रयोगाचीहि व्यवस्था आहे. विणकाम, कातड्याचा धंदा इत्यादींस सहाय देण्यांत येत आहे. प्रो. काळे व श्री. भट ह्यांनीं सुचवल्याप्रमाणें लहानमोठ्या धंद्यास उत्तेजन देण्याचा सरकारचा मानस असून हिंदुस्थान सरकारकडूनाहि जरूर त्या सवलती मिळवण्याची खटपट सरकार करील. कृत्रिम रेशीम व बांबूचा रांधा ह्यांच्यासारखे मोठ्या प्रमाणावरील कारखाने आपल्या देशांत निघणें अत्यावश्यक आहे. कारखानदारांसहि मला अशी सूचना करावीशी वाटते कीं त्यांनीं आपली कार्यक्षमता वाढवली पाहिजे. आणि आपल्या कामगारांस चांगल्या रीतीनें वागवलें पाहिजे. माझा सन्मान केल्याबद्दल मी आपल्या सर्वांचा आभारी आहे."

मराठा चेंबरचे दुसरे चिटणीस श्री.आपटे ह्यांनीं सर्वांचे आभार मानल्यावर समारंभ समाप्त झाला. व्यापार व औद्योगिक व्यवसाय ह्यांत पडलेली सुमारें पाउणशें मंडळी समारंभास उपस्थित होती. सदर्न निटिंग वर्क्सचे चालक श्री. सुपनेकर व कुलकर्णी ह्यांनीं व्यवस्थेबाबत फार परिश्रम केले होते आणि ती त्यांस भूषणावह अशी होती.

## एका नमुनेदार खेडेगांवाचें दृश्य

( लेखकः—श्री. का. वृ. कुलकर्णी, खेड, पुणें. )

ओलें मूळ भेदी खडकाचें आंग । अभ्यासासीं सांग कार्यसिद्धि ॥

पुणें जिल्ह्यांतील खेड तालुक्यांत खेडचे पूर्व बाजूस सुमारें तीन मैल अंतरावर सरपुडी बुद्रुक या नांवाचें लहानसें खेडेगांव आहे. सदर गांवचे लोकांनीं स्वतःचे परिश्रमानें एकजुटीनें व व्यवस्थितपणानें वागून आपले गांवची नमुनेदार सुधारणा करून दाखविली याबद्दल सरकारकडून सदर गांवास "सर फ्रेडरिक साइक्स व्हिलेज इंप्रुव्हमेंट चॅलेंज शील्ड" चालू वर्षी देणेंत आलें आहे. या गांवची माहिती प्रसिद्ध झाल्यास त्याचा थोडा फार उपयोग वाचक वर्गास होईल या दृष्टीनें ती येथें सारांश रूपानें दिली आहे.

सरपुडी बुद्रुक हा गांव अवघा ८०० लोकवस्तीचा आहे. गांवांतील लोकांची विचारसरणी आरंभापासून एकजुटीनें वागणेची असलेमुळें दुफळी वगैरे कांहींहि नाहीं. गांवामध्यें एकोप्यानें वागणेची विचारसरणी जुनी असलेमुळें त्यांनीं प्रथमतः एक ग्रामसुधारणा मंडळ स्थापन केलें. लोकांनीं प्रयत्न करून पुढें स्थानिक ठेवी जमा केल्या व १९१८ सालीं शेतकी सहकारी सोसायटी स्थापन केली. लोकांच्या शेतकी गरजा व अडीअडचणी दूर होणेस हें साधन चांगलें मिळाल्यामुळें तेव्हांपासून त्यांच्यामध्यें संघटित प्रयत्न करण्याची आवड उत्पन्न झाली. पुढारी मंडळींना त्यामुळें मोठमोठ्या शहरीं जाऊन सभांना हजर रहाणें, चर्चा करणें, वाटाघाट करून अडीअडचणींचा विचार करणें, या बाबतींत चांगला वाव मिळाला. शेतकी खातें, सहकारी खातें, लोकलबोर्ड्स्, रेव्हेन्यू खातें, यांजकडून उपलब्ध असलेल्या सवलती व योजना हातीं घेणेस त्यांनीं सुरुवात केली व १९३५ सालीं ग्रामपंचायत स्थापन केली.

गांवचे पुढारी मंडळींनीं व त्यांचे सहायकांनीं आपलेपुढें उच्च प्रकारचे उद्देश नेहमी ठेवल्यामुळे त्यांस अनुसरून गांवांतील सर्व रस्ते गटार काढून दुरुस्त करणेंत आले. स्वच्छतेसंबंधीं व आरोग्यासंबंधीं मागसलेल्या लोकांतूनहि प्रचार केला व गांवांतील सर्व घरें स्वच्छ केलीं. गांवांतून ठिकठिकाणीं खताचे खड्डे होते ते नाहींसे करून गांवाबाहेर खड्डे खणून खताची योजना केली, त्यामुळें गांवांतील सर्व भागांत स्वच्छता होऊन सर्व घाण बाहेर टाकली गेली. शेतकऱ्यांमधून रहात्या घरींच पुढच्या पडवींत जनावरें बांधणेची पद्धत बहुधा चोहोंकडे दिसून येते, परंतु या बाबतींत येथील लोकांनीं दक्षता बाळगून अशा प्रकारची स्वतंत्र योजना ज्याची त्यानें केल्यामुळें अनायासें स्वच्छता राखली गेली. पिण्याच्या पाण्याचीहि अडचण गांवचे लोकांनीं संघटित प्रयत्न करून दूर केली. हा गांव भीमा नदीचे कांठींच वसत असलेमुळें लोकांस पाणी भरपूर मिळतें, तरीहि नदीच्या वहात्या पाण्याचे खालचे बाजूस कपडे धुणें, स्नान करणें, जनावरांसाठीं उपयोग करणें, वगैरे व्यवस्था केलेली आहे. या कामासाठी ग्रामपंचायतीकडून देखरेखीचीहि तजवीज केली जाते. उन्हाळ्याचे दिवसांत नदीस पाण्याचा तुटवडा नेहमी पडतो. या करितां गांवचे लोकांनीं नदीचे कांठीं विहीर खणल्यामुळें ही अडचण दूर झाली आहे. विहीरीचे आसपासहि स्वच्छतेचे दृष्टीनें जरूर ती काळजी घेतलेली नजरेस येते.

गांवांत याप्रमाणें स्वच्छता राखणेचे दृष्टीनें जवळ जवळ सर्व प्रकारची काळजी घेतली असलेमुळें रोगांचा प्रादुर्भाव या ठिकाणीं दिसून येत नाहीं. आसपासचे गांवीं रोगराईचा संपर्क झाल्याचें कळतांच प्लेग, कॉलरा, देवी वगैरे रोगांवर इनॉक्युलेशन फारच मोठ्या प्रमाणांत केलें जातें. खेडेगांवांत टोंचून घेणेंबाबत सरकारी फिरत्या डॉक्टर्सना लोकांचा बराच विरोध असलेला अनुभवास येतो. परंतु सदर गांवीं याबाबत कोणतीहि अडचण येत नाहीं, हें नमूद करणें जरूर आहे. इतकी जरूर ती दक्षता बाळगूनहि गांवांतील कोणी इसम थंडीताप, खोकला, डोकेदुखी, हागवण, वगैरे किरकोळ आजारानें आजारी झाला तर त्यास स्थानिक उपाय म्हणून औषध देण्याची सोय गांवचे लोकांनीं केलेली आहे. इतर गांवचे मानानें येथील मृत्युसंख्या काढल्यास ती फारच कमी प्रमाणांत असल्याचें दिसून येतें हें गांवांस भूषणावह आहे.

( अपूर्ण )

### पश्चिम खानदेश जिल्हा कोऑपरेटिव्ह इन्स्टिट्यूट, धुळें

साक्री व शिरपूर सुपरवायझिंग युनियननें सेक्रेटरींचे रिफ्रेशर ( उजळणी ) वर्ग साक्री, शिरपूर, थाळनेर आणि आर्वे येथें खालीलप्रमाणें भरविले व सेक्रेटरींना वसुलीचें धोरण, अंदाजपत्रक, दप्तराचें काम, हंगामांत सेक्रेटरींचें कर्तव्य वगैरेबाबत माहिती दिली.

| | |
|---|---|
| साक्री ता. १९।१०।३८ | थाळनेर १८।१०।३८ |
| शिरपूर „ | आर्वे १९।१०।३८ |

#### इन्स्टिट्यूटची वार्षिक सभा

वरील इन्स्टिट्यूटची वार्षिक साधारण सभा रविवार ता. २३-१०-३८ रोजीं इन्स्टिट्यूटचे चेअरमन श्री. एस. टी. मोरे, बार-अॅट-लॉ, ह्यांचे अध्यक्षतेखालीं झाली. सभेस सुमारें १००, सोसायट्यांचे प्रतिनिधी हजर होते. अहवाल, ताळेबंद, पुढील वर्षाचा कार्यक्रम व बजेट सर्वानुमतें मंजूर करण्यांत आलीं व सन १९३८-३९ सालाकरितां श्री. दामोदर गणपत पाटील, चेअरमन, श्री. राजाराम राघो पाटील, व्हा. चेअरमन व श्री. साहेबराव सदाशिवराव देशमुख ऑ. सेक्रेटरी व मॅ. कमिटी सभासद ह्यांची एकमतानें निवड करण्यांत आली.

THE
**POONA SPORTS WORKS**
**5, Shukrawar, Tulsibag,**
**POONA.**
FRESH STOCK OF
NEW RACKETS JUST ARRIVED.
*Regutting to Customer's Satisfaction.*

**We have a Reputation to Maintain !**
*Prop* : S. R. Tulsibagwale.

**६ टक्के मासिक ओंवक ठेव**
बॅंक ऑफ इंडियाच्या वरील योजनेप्रमाणें ठेव ठेवून फायदा मिळवा.
जनरल म्यानेजर—बॅंक ऑफ इंडिया ला. इ. कं. लि. पुणें.

## गणेश मोफत वाचनालय

### प्रो. काळे ह्यांच्या तैलचित्राचें अनावरण

येथील गणेश मोफत वाचनालयाचे आद्य सहायक ह्या नात्यानें प्रो. काळे ह्यांचें इचलकरंजीचे चित्रकार, श्री. दातार, ह्यांनीं काढलेलें तैल-चित्र अनावरण करण्याचा समारंभ गेल्या गुरुवारीं सरदार मुजुमदार ह्यांचे दिवाणखान्यांत श्री. दादासाहेब मावळणकर ह्यांच्या हस्तें झाला. त्या प्रसंगीं प्रो. पोतदार ह्यांनीं सरदार मुजूमदार त्यांच्या सहायानें श्री. हरीभाऊ देशपांडे व इतर कार्यकर्ते ह्यांनीं वाचनालय व तदनुषंगिक शिक्षणकार्य निःस्वार्थबुद्धीनें व चिकाटीनें कसें चालविलें आहे ह्याची माहिती सांगितली. श्री. दातार यांनीं आपण श्रीमंत बाबासाहेब, इचलकरंजीचे अधिपति, ह्यांच्या आश्रयानें प्रो. पिंपळखरे ह्यांच्यापाशी चित्रकला शिकत असल्याचें सांगून गणेश मोफत वाचनालयाचे उत्साही कार्यकर्ते, श्री. देशपांडे, ह्यांची निरलस सेवा पाहून प्रो. काळे ह्यांचें चित्र काढून, संस्थेस तें अर्पण करण्यास प्रवृत्त झालों ह्याचा वृत्तांत निवेदन केला. प्रो. काळे ह्यांनीं आपल्या भाषणांत वाचनालयांचें आणि विशेषतः मोफत वाचनालयांचें सामाजिक, आर्थिक आणि राजकीय महत्व किती आहे ह्याचें विवेचन केलें. कित्येक वर्षांमागें पुण्यांत व महाराष्ट्रांत अन्यत्र मोफत वाचनालयांची लाट कशी पसरली आणि ह्या संस्थांपैकी गणेश वाचनालय त्याच्या मेहनती व ध्येयवादी चालकांच्या चिकाटीमुळें कसें तगून राहिलें आहे ह्याचा इतिहास सांगून प्रत्येक नागरिक आपल्या पोटापाण्याचा व्यवसाय संभाळून कोणतें तरी सार्वजनिक उपयुक्ततेचें कार्य करीत राहिल्यावांचून मागसलेल्या हिंदुस्थान देशाचें डोकें वर निघण्याची आशा नाहीं असें प्रो. काळे ह्यांनीं बजावलें. प्रत्येक समाजांत अनेक अशा गोष्टी असतात कीं त्या सरकार व स्थानिक संस्था ह्यांच्याकडे न पाहातां लोकांनीं स्वतःच संघशक्तीनें कराव्या लागतात, ह्या गोष्टीवर त्यांनीं भर देऊन वाचनालयाचे चालक आणि उपस्थित मंडळी ह्यांचे मनःपूर्वक आभार मानले. अध्यक्ष श्री. मावळणकर ह्यांनीं चांगल्या दर्जाचें व उपकारक वाङ्मय तयार होऊन तें जनतेच्या हातीं पडण्याचें महत्त्व प्रतिपादलें आणि नागरिकांनीं स्वतःची जबाबदारी ओळखून स्वकर्तव्य बजावण्याची आवश्यकता राष्ट्रीय प्रगतीच्या दृष्टीनें किती आहे हें विशद करून सांगितलें. श्री. खोले ह्यांनीं निमंत्रित मंडळीचे आभार मानल्यावर अत्तर-गुलाब होऊन समारंभ समाप्त झाला.

---

### पॅलेस्टाइनमध्यें ज्यु विरुद्ध अरब

पॅलेस्टाइनमध्यें सध्या ९ लक्ष, ४० हजार अरब आणि ३ लक्ष ७० हजार ज्यू आहेत. १४ वर्षांपूर्वीं येथें फक्त ५ लक्ष, ९० हजार अरब आणि ८४ हजार ज्यू होते. २० वर्षांपूर्वीं मि. आर्थर बालफर ह्यांनीं पॅलेस्टाइनमध्यें ज्यू लोकांस प्रवेश मिळवून देण्याचें ब्रिटिश धोरण जाहीर केलें, त्यावेळीं तेथें अरब आहेत हे मि. बालफर ह्यांस माहीत नव्हतें, असें म्हणतात! महायुद्धाचे वेळीं ग्रेट ब्रिटननें हुसेन बादशहास अरबांस पूर्ण स्वातंत्र्य देण्यासंबंधीं वचन दिलें, तें अरब विसरलेले नाहींत. राष्ट्रसंघानें पॅलेस्टाइनचा कारभार ग्रेट ब्रिटनकडे सोंपविला, त्यावेळीं ह्या दोन्ही परस्पर विरोधी धोरणाचा पुरस्कार करण्याची कामगिरी ब्रिटननें स्वीकारली. ज्यू मनुष्य पॅलेस्टाइनमध्यें प्रवेश करतेवेळीं स्वतःचें भांडवल आणतो, त्यामुळें त्यास कमी जमीन पुरते. ज्यू लोकांनीं पॅलेस्टाइनमधील सर्व व्यापार आणि उद्योगधंदे काबीज केले आहेत. तेथें शांतता राखण्यास ग्रेट ब्रिटनला दरसाल सुमारें १½ कोटि रुपये खर्च येतो.

संजीवन हेअर टॉनिक
दारुणा, केंस गळणें व टक्कल
ह्यावर अनुभविक उपाय
संजीवन मॅन्युफॅक्चरिंग कं., अहमदाबाद

'अभिनंदनीय प्रगति' असेच बोल नाशिकच्या सह्याद्रि विमा कंपनीबद्दल सर्वांच्या तोंडून निघत आहेत. किमान हप्ते, चोख व्यवस्था, वजनदार संचालक, कर्तबगार प्रतिनिधि व आकर्षक योजना वगैरे अनेक सर्वोत्तम गोष्टी याच संस्थेत आहेत. पॉलिसी किंवा एजन्सी घेण्यापूर्वी आमचा सल्ला घेण्यास चुकूं नका. ठिकठिकाणीं पगार व कमिशनवर प्रतिनिधि पाहिजेत.
लिहा अगर भेटा. मॅनेजिंग डायरेक्टर

सुप्रसिद्ध तुळजाराम मोदी यांचे पेढे व बर्फी वापरा
मोती चौक : : : सातारा

दि प्रॉव्हिन्शिअल बँक ऑफ अिण्डिया लिमिटेड
स्थापना १९३६
मुख्य कार्यालय : २२/अ, हॉस्पिटल रोड (सी. ॲण्ड. अेम् स्टेशन) बंगलूर
शाखा : मुम्बअी, काळबादेवी, दादर, पुणें, पुणें-शहर, नाशिक, पांचगणी, सातारा, कऱ्हाड, सोलापूर, सुरत.
अध्यक्ष : खानसाहिब हाजी अहमद कासम, अेम. अेल. सी.
मॅ. डिरेक्टर : अेस्. पी. ठाकर.
करण्ट डिपॉझिट अकाउण्टस् : १०० रु. किंवा त्याहून अधिक रकमांनीं चालू होतात आणि दैनिक शिलकेवर दरसाल दरशेंकडा २ टक्के व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज डिपॉझिट अकाउण्टस् : ५ रुपये आणि त्याहून अधिक रकमानिशीं चालू होतात आणि मासिक किमान शिलकेवर दरसाल दरशेंकडा ३ टक्के व्याज दिलें जातें. २०० रुपयांपर्यंत कितीहि वेळां पैसे काढतां येतात. हा व्यवहार चेकनें करता येतो.
कायम मुदतीच्या ठेवी : दीर्घकालीन आणि अल्पकालीन मुदतीच्या ठेवी सोयीस्कर अटीवर स्वीकारण्यांत येतात. ह्या संबंधीची माहिती कार्यालयाकडून घ्यावी.
अनुमती मिळालेल्या कर्जरोख्यावर हातउसन्या रकमा मिळतात. सर्व प्रकारचें बँकिंगचें कामकाज केलें जातें.
अधिक माहिती मागवावी.
एम्. मोहन, एजंट, १७ मेनस्ट्रीट, पुणें.
एच. जी. गद्रे, एजंट, लक्ष्मीरोड, पुणें. २

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी कर्जरोखे

| | |
|---|---|
| ५% कन्माफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११६–१० |
| ५% ( १९३९–४४ ) लोन ... ... ... | १०२—५ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०८—५ |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९८—६ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०५—५ |
| ३½% १९४८–५२ ... ... ... | ९९—८ |

### निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ४% पोर्ट ट्रस्ट ( बिगर गॅरंटी व लांब मुदत ) ... | ११०—० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०९—० |
| ४% मुंबई सिटी इंप्रूव्हमेंट ट्रस्ट बाँड ( ७० वर्षे मुदत ) | १०९—० |
| ४% म्हैसूर कर्ज ( १९५३–६३) ... .. | १११—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२४—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया (१००—५०) ११% ... ... | १४७—० |
| बँक ऑफ बरोडा (१००—५०) १०% ... ... | ११२–१२ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% ... | ३०—० |
| इंपीरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५७६—४ |
| बाँबे प्रॉ. को. बँक ( ५० ) ५% ... ... | ६०—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | ११५—८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) १३% ... ... | १२४—० |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १७५—० |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १६५—० |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३३५—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १४५०—० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | १०३—४ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) ४½% ... ... | ९५—८ |
| अहमदाबाद प्रांतज (५००) १२½% | ९४०—० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७३०—४ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | १८६—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४१—८ |
| शिंद्या स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २०—१ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | ३८—८ |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३२५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०६—० |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १६०—८ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १० रु. ... ... | ३१७—० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ३६ रु. ३ आ. ६ पै ... | १५३०—० |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ७ रु. ८ आ. ... | ११२–१२ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ३६–१५–६ |
| चांदी ( मिंट ) प्रत्येक १०० तोळ्यास ... ... | ५१–४–० |

### अंड्यांचा किफायतशीर धंदा

हिंदुस्थान सरकारच्या ॲग्रिकल्चरल मार्केटिंग अडव्हायसरनें हिंदुस्थानांतील कोंबड्यां आणि त्यांचीं अंडीं ह्यासंबंधीं माहिती गोळा करून तिच्या आधारावर आपला रिपोर्ट तयार केला आहे. अंड्यांचा धंदा नीट नियंत्रित करण्यांत आला तर हिंदी शेतकऱ्यांस दरसाल ६ कोटि रुपये मिळूं शकतील, असें त्याचें म्हणणें आहे. ह्या सल्लागाराच्या रिपोर्टांतील कांहीं माहिती येथें दिली आहे:-

"कावळे, उंदीर, इत्यादि दरसाल १५ लक्ष रुपयांचीं अंडीं पळवतात. वहातुकीमध्यें निदान १५ लाखांचीं अंडीं फुटतात. अंडीं बाजारांत विकलीं जाण्यापूर्वीं तीं अतिशय शिळीं होऊन त्यामुळेंहि फार तोटा होतो. पेशावर, किलॉन, दिल्ली, मुंबई, लखनौ आणि रामपूर येथें अंड्यांची प्रतवारी लावून विक्रीची व्यवस्था करणारीं केंद्रें स्थापन करण्यांत आलीं आहेत. चांगल्या मालास अधिक किंमत देण्यास लोक तयार असतात असें तेथील अनुभवावरून दिसून येतें. हिंदी अंड्यांची निर्गत रोडावली आहे, तीमध्यें वाढ होण्यास पुष्कळ वाव आहे. अंड्यांतील बलक, अल्ब्युमेन, इत्यादींस चांगली मागणी असते आणि ती पुरविण्याचा यत्न हिंदी उत्पादकांनीं करण्याजोगा आहे. कोंबड्यांच्या अंड्यांचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्नहि झाले पाहिजेत."

### त्रावणकोर प्रकरणांत सर जेम्स टेलर ह्यांची दिलगिरी

रिझर्व बँकेचे गव्हर्नर, सर जेम्स टेलर, इत्यादींवर कोर्टाच्या बेअदबीबद्दल मद्रास हायकोर्टाकडे अर्ज करण्यांत आला होता. त्याचा हायकोर्टाच्या फुल बेंचानें गेल्या आठवड्यांत निकाल दिला. त्रावणकोर बँकेच्या प्रकरणांतून हा अर्ज उपस्थित झाला होता. ता. २२ जुलै रोजीं सर जेम्स टेलर ह्यांनीं मद्रासच्या मुख्य प्रधानास त्रावणकोर बँकेच्या संबंधांत पत्र लिहिलें, तेव्हां त्यांत त्यांनीं हायकोर्टानें बँक गुंडाळण्यांत यावी असा निकाल देण्याविषयीं आपलें मत व्यक्त केल्यासारखें होत असल्यानें "कोर्टापुढें येणार असलेल्या प्रकरणावर मत देणें हें कोर्टापुढें असणाऱ्या प्रकरणावर चर्चा करण्याइतकेंच अयोग्य आहे" असा फुल बेंचानें आपला अभिप्राय देऊन प्रतिवादींची दिलगिरी स्वीकारली आणि अशा प्रकारची परिस्थिति पुनः निर्माण होणार नाहीं अशी आशा व्यक्त केली.

### हिंदी कॉफीचा प्रचार

इंडियन कॉफी सेस कमिटीस १९३९-४० मध्यें १ लक्ष, ३० हजार रुपये उत्पन्न मिळेल अशी तिची अपेक्षा आहे, ह्या रकमेपैकीं, हिंदुस्थानांत कॉफीचा प्रचार करण्यासाठी कमिटीनें ५५½ हजार रुपये राखून ठेवले असून ५४½ हजार रुपये ती ग्रेटब्रिटनमधील आणि युरोपांतील प्रचारावर खर्चणार आहे.

### हप्तेबंदीनें विक्री

ग्रेट ब्रिटनमध्यें दरसाल सुमारें १२० कोटि रुपयांचा माल हप्तेबंदीनें विकला जातो. मोटारींपैकीं शेकडा फक्त चाळीस आणि रेडिओपैकीं शेकडा फक्त तीस इतक्या नगांचा रोखीनें व्यवहार होतो.

## पेट्रोलचें जागतिक उत्पादन
( हजार मेट्रिक टन* )

| वर्ष | एकूण जग | अमेरिका | रशिया | वेनेझुएला | इराण | रुमानिया | मेक्सिको | इराक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९२१ | १०७,५९४ | ६४,७१८ | ४,००१ | २१८ | २,२२३ | १,१६८ | २८,९७८ | — |
| १९२५ | १४८,४१७ | १०४,६२२ | ७,०६० | २,८८४ | ४,६५२ | २,३१७ | १७,६२६ | — |
| १९३० | १९६,३४७ | १२३,११७ | १८,४५१ | २०,१५४ | ६,०३४ | ५,७९२ | ५,९१४ | १२१ |
| १९३१ | १८९,२९९ | ११६,६८३ | २२,३९२ | १७,१९२ | ५,८४३ | ६,७५६ | ४,९३४ | १२० |
| १९३२ | १८०,५४१ | १०७,६४५ | २१,४१३ | १७,०८५ | ६,५४९ | ७,३४८ | ४,८४२ | ११५ |
| १९३३ | १९७,१११ | १२२,५३६ | २१,४८९ | १७,२९३ | ७,२०० | ७,३७७ | ५,०८७ | ११५ |
| १९३४ | २०८,०७८ | १२२,९३१ | २४,२१८ | २०,११२ | ७,६५८ | ८,४६६ | ५,६६७ | १,०३१ |
| १९३५ | २२६,३८४ | १३४,९१२ | २५,२४० | २१,९९० | ७,६०८ | ८,३७६ | ५,९७३ | ३,६८२ |
| १९३६ | २४६,४९० | १४८,८६८ | २७,३८५ | २२,९४५ | ८,३३० | ८,६७६ | ६,०९१ | ४,०११ |
| १९३७* | २७८,६४५ | १७२,९६० | २७,८२१ | २७,७१६ | १०,४४९ | ७,१४९ | ६,९०३ | ४,२५८ |

* १ मेट्रिक टन = २६४·१७ गॅलन.

### हिंदी रोखे धारण करणाऱ्या ब्रिटिश लोकांस सवलत

" हिंदुस्थान सरकारच्या कर्जरोख्यांत पैसे गुंतविणाऱ्या ब्रिटिश मनुष्याचे रोखे इंग्लंडमध्यें नोंदले जातात आणि ह्या रोख्यांवरील व्याज कलकत्त्यावरील ड्राफ्टचे रूपानें त्यास मिळतें. ब्रिटिश सरकारचे रोखे धारणकरणाऱ्या हिंदी मनुष्यास लंडनवरील ड्राफ्टचे रूपानें व्याज मिळण्याची सवलत नाहीं, आणि ती मिळविण्याचा यत्न करण्याचा सरकारचा विचारहि नाहीं, " असें सर जेम्स ग्रिग ह्यांनीं मध्यवर्ती असेंब्लींत सांगितलें.

### ग्लासगोचें प्रचंड प्रदर्शन

ग्लासगो येथील औद्योगिक प्रदर्शन नुकतेंच समाप्त झालें. शेवटच्या दिवशीं ३४७,४९२ लोकांनीं पैसे देऊन प्रदर्शन पाहिलें. प्रसिद्ध वेंबले प्रदर्शनाच्याहि प्रेक्षकांची एका दिवसाची संख्या ३,२१००० इतक्याच्यावर गेली नव्हती. शेवटच्या दिवशीं गर्दीची नीट व्यवस्था ठेवण्याकरितां नेहमीपेक्षा एक हजार जादा पोलीस ठेवण्यांत आले होते आणि एक हजार ट्रामगाड्या व पांचशे बसेस लोकांच्या सोयीसाठीं उपयोगांत आणल्या होत्या. एकूण सव्वा कोटि लोकांनीं हें प्रदर्शन पाहिलें. अपेक्षेच्या मानानें पंचवीस लक्ष प्रेक्षक कमी भरले. नुकसान आल्यास तें भरून काढण्यासाठीं कित्येक लोकांनीं मिळून एक कोटि रुपयांची हमी घेतली आहे, तिचा थोडासा उपयोग करावा लागेल.

### इटलीची नफेबाजीविरुद्ध तक्रार

सुएझ कालव्यामधून जाणाऱ्या-येणाऱ्या मालावर जी जकात आकारण्यांत येते, तिची रकम कालव्याचे चालू खर्चाचे मानानें अनेक पटींनीं मोठी आहे. कालव्यांतून वहातुक करणाऱ्या देशांत,माल वहाण्याचे दृष्टीनें, इटलीचा दुसरा अनुक्रम लागतो. परंतु त्या प्रमाणांत त्या देशास जकातीचे आकारणीमध्यें सवलत मिळत नाहीं. कालवा-कंपनीच्या ह्या नफेबाजीविरुद्ध इटलीनें तक्रार केली आहे.

### हिंदुस्थानांतील कोळशाचें उत्पादन

सन १९३७ मध्यें हिंदी खाणींतून ७ कोटि रुपये किंमतीचा २३ कोटि टन दगडी कोळसा निघाला; म्हणजे १९३६ च्या मानानें १¼ कोटि रुपये किंमतीच्या १७¾ लक्ष अधिक कोळशाचें उत्पादन झालें. उत्पादनाचे प्रांतनिहाय आंकडे खालीलप्रमाणें आहेत:—

| | |
|---|---|
| बिहारः | १ कोटि ३८¾ लक्ष टन |
| बंगालः | ६५½ " " |
| मध्यप्रांतः | १५ " " |

१९३७ सालीं एकूण १८ लक्ष टन कोळसा निर्गत झाला; १९३६ सालीं १७ लक्ष टनांची निर्गत झाली होती. १२४ खाणींतून विजेच्या शक्तीनें कोळसा काढण्यांत येतो. कोळशास मागणी चांगली असल्याकारणानें त्याचा बाजारभावहि चढीचा राहिला.

The Co-operators' Book Depot.
9, Bakehouse Lane,
FORT, BOMBAY.
The Only Book Depot of its Kind in India.
*Specialising in*
Books on Economics, Co-operation, Banking and Finance, Accountancy and Auditing, Commerce, Business Organisation, Rural Reconstruction and allied Subjects.
Books on all Subjects and of all Publishers in India, England and America are readily supplied at the published Prices.

DECCAN BOOK STALL
Booksellers, Publishers & Subscription Agents
Fergusson College Road, Poona No. 4
(1) We stock and supply Educational books, General books & Library books.
(2) We supply Government of Bombay and Government of India publications.
(3) We receive Subscriptions to Indian and Foreign periodicals.
(4) We procure any book published anywhere and supply it at publisher's price.

अप-टु-डेट शिलाई करतां

## महिंद्रकर ब्रदर्स यांचेकडे चौकशी करा

बुधवार चौक, पुणें ] १२ तासांत कपडे शिवून मिळतील. [ खादी भांडाराचे माडीवर

## पराडकर टेलर्स ॲकॅडिमी

( सिटी पोस्टासमोर पुणें २ )
येथें शिवणकलेचें शास्त्रीय व व्यावहारिक धंदेशिक्षण फीसुद्धां सर्व खर्च मिळून फक्त ११० रु. त
पूर्ण खात्री होईपर्यंत मिळतें.

**पाहिजेत !** खालील सुप्रसिद्ध विमा कंपनीकरितां **महाराष्ट्रांत व कर्नाटकांत** कांहीं ऑर्गनायझर व एजन्टस् पगारी कमिशनवर नेमणे आहेत.

## दि ग्रेट सोशल लाइफ ॲन्ड जनरल ॲशुअरन्स कं. लि.

( हेड ऑफिस : जळगांव )

माहिती मागवा | चीफ ऑर्गनायझिंग ऑफिस, लक्ष्मी रोड, पुणें २




**स्त्रियांचा आजार** म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे याद्वीवरून तयार केलेलें असून आज सतत ६० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, डोकें दुखणें, शौच्यास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा हमखास गुण या आर्डोमिक्समध्यें असल्यामुळें वैद्य व डॉक्टर्स मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारास टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

**धी इंडो फॉरिन एजन्सीज** ( डि. नं. ६ )
२५३।३ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.

पूर्वीची कर्जयोजना चालू असून शिवाय कर्जखातें नं. २ नें

**द. म. द. शें. ४ चार आणे व्याजानें**
**व**
**अनुक्रमानें रु. १०० ते २०००**

देण्याची नवीन योजना. **लवकर अर्ज करा; लवकर कर्ज मिळवा.** त्वरा करा आणि प्रॉस्पेक्टस व एजन्सीसाठीं ०२-आण्याचीं तिकिटें पाठवा अगर समक्ष भेटा.

**दि हिंदुस्थान इंडस्ट्रियल कंपनी, लि.**
हेड ऑफिसः-गिरगांव, मुंबई. ब्रँचः-लक्ष्मी रोड, पुणें नं. २

## फर्म, कंपनी आणि सोसायटी

यांचा प्रचलित कायदा काय आहे यासंबंधीं साताराचे प्रसिद्ध कायदानिपुण वकील श्री. के. बा. गजेंद्रगडकर यांनीं लिहिलेली लेखमाला "न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः सुरू आहे. त्याचप्रमाणें मुंबई हायकोर्टाचे निवाडे व वेळोवेळीं होणारे प्रान्तिक कायदे प्रत्येक अंकांत प्रसिद्ध होतात. फर्म, कंपनी आणि सोसायटी यासंबंधीं येत असलेली श्री. गजेंद्रगडकर यांची लेखमाला मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें मासिक अवश्य संग्रहीं ठेवा. वा. व. ट. ख. सह फक्त ५ रु; नमुना अंकासाठीं सात आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर,
"न्यायबोध" मासिक, नागपूर शहर.

**व्ही. व्ही. ॲन्ड को०**
जंपर स्पेशालिस्ट
लेडीज ॲन्ड जेन्टस टेलर्स,
८ निहाल पेठ (मुदलीयार रोड), पुणें शहर

## K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यात रा. अनंत विनायक पटवर्धन, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाविलास,' भांबुर्डा, घ. नं. ९२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.